आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२५ ऑगस्ट २०२६ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- युपीआय प्रणालीची सुरुवात हा भारताच्या डिजिटल पेमेंट इतिहासातला सर्वात मोठा निर्णायक क्षण असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- देशांतर्गत बाजारात साखरेची उपलब्धता वाढावी यासाठी केंद्र सरकारनं शुल्कमुक्त तत्वावर आयात केलेल्या साखरेची विक्री करण्याच्या कालावधीत केला बदल

- केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन आजपासून कॅनडा आणि अमेरिकेच्या दौऱ्यावर

**आणि**

- एच.वन.बी. व्हिसासाठीच्या अर्जांवर सध्याच्या शुल्काव्यतिरिक्त १ लाख डॉलरपेक्षा जास्त नवं शुल्क आकारण्याचा अमेरिकेच्या गृह विभागाचा प्रस्ताव

**<><><><><>**

युनिफाइड पेमेंट इंटरफेस अर्थात युपीआय प्रणालीला १० वर्षे पूर्ण झाली आहेत. २०१६ मध्ये या डिजिटल पेमेंट प्रणालीचा प्रारंभ झाला होता. तेव्हापासून आजपर्यंतच्या वाटचालीत युपीआय हे नागरिकांच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनला आहे. या प्रणालीमुळे महिला, छोटे व्यापारी, विद्यार्थी आणि नवउद्योजकांना आर्थिक व्यवहार अधिक सुलभतेनं तसंच, सुरक्षित स्वरुपात आणि तत्काळ करणं शक्य झालं आहे.

युपीआय या डिजिटल क्रांतींचा प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटायला हवा असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. युपीआयला १० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावर संदेश सामायिक केला आहे. युपीआय प्रणालीची सुरुवात हा भारताच्या डिजिटल पेमेंट इतिहासातला सर्वात मोठा निर्णायक क्षण ठरला, असं त्यांनी या संदेशात म्हटलं आहे. देशवासियांनी युपीआयबद्दलचे आपले अनुभव सामायिक करावेत असं आवाहनही त्यांनी केलं आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी देखील युपीआयला दहा वर्षे पूर्ण झाल्याबद्दल आनंद व्यक्त केला आहे. युपीआयचा ही जगातली सर्वात मोठी वास्तव वेळेतली पेमेंट व्यवस्था असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. युपीआय हे नवोन्मेषाच्या माध्यमातून भारताचा परिवर्तनाच्या

वाटचालीचा मार्ग प्रशस्त करण्याच्या प्रधानमंत्री मोदी यांच्या संकल्पनेचं एक उत्तम उदाहरण असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

केंद्र सरकारनं शुल्कमुक्त तत्वावर आयात केलेल्या कच्च्या साखरेवर प्रक्रिया करून तिची विक्री करण्याच्या कालावधीत बदल केला आहे. यानुसार आता आयातदारांना बिल ऑफ एंट्री दाखल केल्याच्या तारखेपासून जास्तीत जास्त दोन महिन्यांच्या आत कच्च्या साखरेचं रिफाइंड साखरेत रूपांतर करून ती देशांतर्गत बाजारात विक्रीसाठी उपलब्ध करावी लागेल. आगामी सणासुदीच्या काळात देशांतर्गत बाजारात साखरेची उपलब्धता वाढवावी आणि किमतींवरचा ताण कमी करण्याच्या प्रयत्नांचा भाग सरकारनं हा निर्णय घेतला आहे.

परकीय व्यापार महासंचालनालयानं ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीला टॅरिफ रेट कोटा योजनेअंतर्गत १० लाख टन कच्च्या साखरेच्या आयतीला परवानगी देण्यात आली होती. ही आयात केलेल्या कच्च्या साखरेवर प्रक्रिया करून ३१ ऑक्टोबरपर्यंत देशांतर्गत बाजारात विकण्याची कालमर्यादा निश्चित केली गेली होती. मात्र देशांतर्गत बाजारात साखरेच्या दरात झालेली वाढीच्या पार्श्वभूमीवर आता ही कालमर्यादा बिल ऑफ एंट्री दाखल केल्याच्या तारखेपासून जास्तीत जास्त दोन महिन्यांची केली गेली आहे. इतर कोणत्याही अटी आणि शर्तींमध्ये बदल केला नसल्याचं सरकारनं स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

सीएए अर्थात नागरिकत्व सुधारणा कायद्यांतर्गत सुनावणी घेण्याचे आणि पात्र अर्जदारांना नागरिकत्वाचे दाखले देण्याचे अधिकार केंद्र सरकारने पश्चिम बंगाल सरकारला दिले आहेत. केंद्रीय गृह मंत्रालयाने यासंदर्भात राजपत्रित अधिसूचना जारी केली आहे. पश्चिम बंगालमधल्या २ लाख ३० हजार अर्जदारांपैकी आतापर्यंत पात्र ठरलेल्या २३ हजार जणांना नागरिकत्वाचे दाखले देण्यात आले आहेत, असं मुख्यमंत्री सुवेंदु अधिकारी यांनी म्हटलं आहे. उर्वरित अर्जांवर त्वरित कार्यवाही करून संबंधित जिल्हा दंडाधिकाऱ्यांमार्फत दाखले सुपूर्द केले जातील, असंही ते म्हणाले.

<><><><><>

ईपीएफओ अर्थात कर्मचारी भविष्य निर्वाह निधी आणि प्राप्तिकर परताव्याच्या माहितीचा गैरवापर होऊ नये यासाठी सुरक्षा उपाययोजना निश्चित करण्याचे निर्देश सर्वोच्च

न्यायालयानं केंद्र सरकारला दिले आहे. पियुष शर्मा यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेवर काल सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि व्ही. मोहना यांच्या पीठासमोर सुनावणी झाली. वैयक्तिक माहिती खासगी संस्थांपर्यंत पोहोचणं ही चिंतेची बाब असल्याचं सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे. व्यावसायिक तंत्रज्ञान परिसंस्थेत होणाऱ्या वैयक्तिक माहितीच्या देवाणघेवाणीविषयी खंडपीठानं चिंता व्यक्त केली आहे. या क्षेत्रातल्या तज्ञांच्या मदतीनं या समस्येचे निराकरण करण्यासाठी एक प्रभावी यंत्रणा विकसित करावी, असा सल्ला न्यायालयानं केंद्र सरकारला दिला आहे.

**<><><><><>**

निवृत्त न्यायमूर्ती सुनील बाळकृष्ण शुक्रे यांना आज महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी राज्याच्या लोकायुक्त संस्थेचे अध्यक्ष म्हणून शपथ दिली. मुंबईतल्या लोकभवनात या शपथविधी सोहळा पार पडला. या सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. शपथविधीनंतर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी निवृत्त न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांचं अभिनंदनही केलं.

**<><><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आजपासून कॅनडा आणि अमेरिकेच्या दौऱ्यावर रवाना होत आहेत. अर्थ मंत्रालयानं दिलेल्या माहितीनुसार, द्विपक्षीय आर्थिक आणि वित्तीय भागीदारी बळकट करणं, गुंतवणूक संबंध दृढ करणं तसंच सामायिक जागतिक आर्थिक प्राधान्यक्रमाच्या मुद्द्यांवर सहकार्य वृद्धिंगत करणं यांवर भेटीत प्रमुख भर दिला जाणार आहे. या दौऱ्यात, सीतारामन कॅनडाच्या अर्थमंत्र्यांशी भेट घेऊन आर्थिक आणि वित्तीय संवाद साधतील. शिवाय प्रमुख कंपन्यांचे अध्यक्ष, वरिष्ठ प्रतिनिधींशी संवादही साधणार आहेत.

दुसऱ्या टप्प्यात, त्या अमेरिकेत गुंतवणूकदारांच्या गोलमेज परिषदेत सहभागी होतील. तसंच ॲशविले इथं अमेरिकेच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या जीवीस अर्थमंत्री आणि मध्यवर्ती बँकेच्या गव्हर्नर्सच्या बैठकीत सीतारामन भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व करतील.

**<><><><><>**

एच.वन.बी. व्हिसासाठीच्या अर्जांवर सध्याच्या शुल्काव्यतिरिक्त १ लाख ३ हजार २६५ अमेरिकी डॉलर इतकं नवं शुल्क आकारण्याचा प्रस्ताव अमेरिकेच्या गृह विभागानं मांडला

आहे. याअंतर्गत उच्च पदवीधारकांद्वारे केल्या जाणाऱ्या अर्जांचाही समावेश आहे. ज्या एच.वन.बी. व्हिसासाठी मर्यादेचा नियम लागू नाही अशांसाठी हे शुल्क लागू नसेल. याअंतर्गत काही ना नफा ना तोटा तत्वावरच्या संशोधन संस्था, सरकारी संशोधन संस्था आणि उच्च शिक्षण संस्थांकडून दाखल होणाऱ्या अर्जांचा अंतर्भाव असेल असं या प्रस्तावात म्हटलं आहे.

अर्ज दाखल करतानाच हे प्रस्तावित शुल्क घेतलं जावं अशी तरतूदही या प्रस्तावात मांडली आहे. अमेरिकेकडे एच.वन.बी.व्हिसासाठी दरवर्षी अंदाजे ८५ हजार अर्ज केले जातात. या नव्या शुल्क आकारणीमुळे वर्षाला सुमारे ८ अब्ज ८० कोटी अमेरिकी डॉलरचा महसूल मिळेल असा अंदाज विभागानं वर्तवला आहे.

<><><><><>

अमेरिकेचे अर्थमंत्री स्कॉट बेसेंट यांनी इराणविरुद्ध आर्थिक दृष्ट्या डी-डे अर्थात निर्वाणीच्या कारवाईची घोषणा केली आहे. याअंतर्गत इराणच्या लष्करी गरजा, खरेदी व्यवस्था तसंच पेट्रोलियम आणि पेट्रोकेमिकल व्यापाराशी असलेल्या कथित संबंधांवरून सुमारे ६० संस्था, व्यक्ती आणि जहाजांवर निर्बंध लादले आहेत. जागतिक अर्थव्यवस्थेला ओलीस ठेवण्यासाठी इराणद्वारे वापरल्या जाणाऱ्या महसुलाला आळा घालणं हा यामागचा उद्देश असल्याचं बेसेंट यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, अमेरिकेच्या या विस्तारित निर्बंधांचा दोन वर्षांपर्यंत सामना करण्यासाठी इराण सज्ज असल्याची प्रतिक्रिया इराणनं दिली आहे. निर्बंध असतानाही तग धरण्यासाठी इराणकडे स्वतःची संसाधनं असल्याचं इराणचे अर्थमंत्री अली मदानीजादेह यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

भारत आणि श्रीलंका यांच्यात कोलंबो इथं सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या तिसऱ्या दिवशी, श्रीलंका पहिल्या डावात अजूनही मोठ्या पिछाडीवर आहे. श्रीलंकेनं आज आपला पहिला डाव कालच्या २ बाद ८ या धावसंख्येवरून पुढे सुरु केला. मात्र प्रसिद्ध कृष्णा यानं सलामीवीर कमील याला लवकर माघारी धाडत श्रीलंकेला तिसरा धक्का दिला. त्यानंतर आलेल्या कामिंदू यानं अर्धशतकवीर पसिंदूसोबत ८७ धावांची भागिदारी करत श्रीलंकेचा डाव सावरला. प्रसिद्ध कृष्णा यानंच कामिंदू याला बाद करत ही जोडी फोडली.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा पहिल्या डावात श्रीलंकेच्या ५ बाद १४६ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

बंगालच्या उपसागरावर कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाल्यानं आसपासच्या अनेक भागांमध्ये त्याचा प्रभाव दिसून येत आहे. दक्षिण बंगालमध्ये अनेक भागांमध्ये पाऊस पडण्याची शक्यता आहे. उत्तर आणि दक्षिण २४ परगणा, मिदनापूर, झारग्राम, पुरुलिया, बांकुरा, कोलकाता आणि हावडा या जिल्ह्यांना हवामान विभागाने येलो अलर्ट जारी केला आहे. झारखंडमध्ये पुढील चार दिवस पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. तर दहा जिल्ह्यांना २७ ऑगस्टपर्यंत येलो अलर्ट जारी केला आहे. ओदिशामध्ये आजपासून पावसाचा जोर ओसरण्याची शक्यता आहे तर उत्तर किनारपट्टीवरच्या जिल्ह्यांमध्ये मध्यम स्वरूपाचा पाऊस पडू शकतो. भद्रक आणि जाजपूर जिल्ह्यांमध्ये सतत होणाऱ्या पावसामुळे पूरस्थिती निर्माण झाल्याने काही ठिकाणी शाळा बंद ठेवण्यात आल्या आहेत. हवामान विभागाने १६ जिल्ह्यांना येलो अलर्ट जारी केला आहे.

बिहारमध्ये गंगेच्या पाणीपातळीत वाढ झाल्याने पाटणासह अनेक जिल्ह्यांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. गंगेच्या पाणीपातळीत वाढ झाल्याने भागलपूर आणि बेगुसराय जिल्ह्यांमधल्या संरक्षक बांधांना तडे गेल्याने शेकडोहून अधिक लोक बाधित झाले आहेत. दरम्यान मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांनी पूरग्रस्त जिल्ह्यांची हवाई पाहणी करून अधिकाऱ्यांना तातडीने बचाव कार्य राबवण्याचे निर्देश दिले.

**<><><><><>**

छत्तीसगढ आणि मध्य प्रदेशमध्ये आज जोरदार ते अति जोरदार पावसाचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, मध्य महाराष्ट्र, विदर्भ, ईशान्य भारत, पश्चिम बंगालचा काही भाग, तामिळनाडू, पुद्दुचेरी, कराईकल, कर्नाटक किनारपट्टीचा काही भाग आणि केरळ इथं मुसळधार पाऊस होण्याची शक्यता आहे. तर पूर्व राजस्थान, ओदिशा, आंध्र प्रदेश, अंदमान आणि निकोबार बेट, लक्षद्वीप आणि कर्नाटकमध्ये विजांचा कडकडाट आणि सोसाट्यांच्या वाऱ्यांसह वादळी पावसाचा अंदाज वर्तवला आहे.

**//<><><><><>//**